
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

नदी विशेषांक

# तिफण


दिवाळी - २०२३

वर्ष : १४ वे । अंक : तिसरा / चौथा
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२३



• वर्ष : १४ वे । अंक : तिसरा/चौथा

*ऑक्टोबर ते डिसेंबर : २०२३*





# तिफण

नदी विशेषांक
दिवाळी २०२३

संपादक

डॉ. शिवाजी भिकाजी हुसे

रेखाटने : जितेंद्र साळुंके, संतोष तांदळे




**UGC Care Listed Journal**

ISSN 2231-573X

साहित्य, कला आणि
लोकसंस्कृतीला वाहिलेले

त्रैमासिक

# तिफण

नदी विशेषांक

**वर्ष :** १४ वे, **अंक :** तिसरा/चौथा
ऑक्टोबर ते डिसेंबर : २०२३

**संपादक :**
**डॉ. शिवाजी हुसे**

**संपादक मंडळ :**
डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. दिलीप बिरुटे,
डॉ. ताहेर पठाण, डॉ. रामचंद्र झाडे,
डॉ. सुभाष बागल, डॉ. दत्तात्रय डुंबरे,
डॉ. सुभाष शेकडे, डॉ. सुखदेव इघारे,
डॉ. प्रेमला मुखेडकर, डॉ. राजकुमार मुसणे,
डॉ. रंजना कदम, डॉ. यशवंत सोनुने

**मुखपृष्ठ :** निसर्ग ग्राफिक्स
(छायाचित्र व कवितेच्या ओळी : अरुण म्हात्रे)
मुद्रक : रुद्रायणी, छत्रपती संभाजीनगर.

**अक्षरजुळणी, मांडणी व सजावट :**
मंदार नागरे, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४०४६११५९६

**• वर्गणी •**
वार्षिक सहयोग मूल्य : रु. ५००/-

**वर्गणी अशीही भरता येईल-**
संपादक, 'तिफण', बँक ऑफ महाराष्ट्र
शाखा : कन्नड, खाते क्र. 60287405377
आय.एफ.एस.सी. कोड क्र. MAHB0000259


**स्वागत मूल्य : ४५० रुपये**

**संपादन :** अवैतनिक

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
डॉ. शिवाजी हुसे, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड- ४३१ १०३,
जि. छत्रपती संभाजीनगर. मो. ९४०४०००३९८
Email : tiphanmasik@gmail.com

(या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.



सोबत येतील त्यांना पुढे घेऊन जाण्याचे व्रतच जणू नदीने घेतलेले असते. कुचकामी, संधीसाधू, वेळसाधु असतात अशा गोष्टींना नदीदेखील आपल्या पात्रात जागा देत नाही. नकोशा गोष्टी हळुवारपणे बाजूला सारत कसलीही खंत न करता मार्गक्रमण करतच असते. तिची शेवटपर्यंत सोबत करत असतं ते नितळ, स्वच्छ, खळखळून हसणारं कसलाही आडपडदा न ठेवणारं पाणी!

आपल्याही आयुष्यात अशीच पाण्यासारखी नितळ, स्वच्छ मनाची, खडतर प्रवासात देखील साथ न सोडणारी काही मोजकीच माणसं असली म्हणजे कुबेराहून अधिक श्रीमंती वाट्याला येते. वाटेत येणारे दगड, मार्ग आडविणारा कचरा, मनाचा तळ ढवळून काही काळासाठी का होईना मन गढूळ करणारी ढोंगी चिवट माती सारं काही निमूटपणे, हळुवारपणे दूर करता यायला हवं... अगदी आपला प्रवास न थांबवता! सागरभेटीची ओढ आपसूकच आत मुरत जाते. फक्त आपल्याला स्वतःची पायवाट स्वतःच निर्माण करून खळखळून वाहणारी नदी होता यायला हवं इतकंच!

© प्रा. मंगल सांगळे.

# अनुक्रमणिका


**• नदी विशेषांक •**

संपादकीय ... ०९

१. नदी समजून घेताना ... ११

२. माझी सिंदफणा नदी : एक भळभळती जखम ... १४

३. नदी आणि संस्कृती ... १८

४. 'नदी संदर्भ' समाज संस्कृतीचे उत्थान ... २१

५. नद्या : भारतीय संस्कृतीच्या पाउलखुणा... २६

६. नदी – लोकमाता ... ३५

७. जीवनदायिनी नदी ... ४३

८. नदीकाठ आणि मी ... ४७

९. मी नर्मदापूत्र ... ५६

१०. नदी देवता व शिल्प ... ६४

११. नदी, ताई आणि मी ... ७०

१२. वारसा नदीचा ... ७५

१३. कमलदलाचे जलबिंदू ... ८०

१४. स्वप्न सत्यात उतरवायचंच ... ८४

१५. जगुबा धनगर ... ८८

१६. मानवी जीवन व वाङ्मयातील नदीचे स्थान ... ९१

१७. वर्धा नदीच्या परिप्रेक्ष्यातील मानवी जीवन ... ९६

१८. गाहासत्तसई (गाथासप्तशती) या ग्रंथातील नद्या आणि त्यांचे संदर्भ ... १०१

१९. मानवी जीवनाच्या पुनर्रचनेत नद्यांचे योगदान : एक दृष्टीक्षेप ... १०९

२०. संत तुकारामांची नदी विषयक सुभाषिते... ११४

२१. कवीच्या दृष्टीक्षेपातील नदी ... ११९

२२. आजोळची जीवनदायिनी : चिखली ... १२३

२३. माणदेशाची वरदायीनी माणगंगा नदी .... १२८

२४. सीना नदी : शुष्क प्रदेशातील जीवनदायिनी ... १३५

२५. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जीवनवाहिनी कर्ली नदीची स्थिती ... १४०

२६. भारतीय संस्कृती आणि 'यमुना' ... १४६

२७. नमामि चंद्रभागा ! ... १५२

२८. नाईल नदी व इजिप्त...नेत्रसुखद अनुभुती... १५६

२९. गोदावरी नदी : जैविक शुद्धीकरण ... १५९

३०. पाणी, केप टाऊन आणि आपण ... १६२

३१. धुरी : आपत्ती निवारण ... १७१

३२. सोन्याचा धूर, कारखान्यातून नव्हे; तर जलविकासातून ... १७५

३३. जल सुरक्षा : भारतातील समस्या आणि आव्हाने ... १८०

३४. नदी प्रदूषण : एक घातक समस्या ... १९१

३५. सरस्वती नदीचे श्रीगोंदा तालुक्यातील योगदान ... १९७

३६. नदी, पर्जन्यमान आणि दुष्काळ : यातील परस्पर संबंध ... २०३

३७. मुसी नदी: जीवनाच्या स्त्रोतापासून ड्रेनेजपर्यंत ... २०८


३८. 'मानवलोक' स्वयंसेवी संस्थेची नदी संवाद यात्रा - एक अनुभव ... २१५

३९. दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी 'जल आराखडा' ... २२५

४०. नदीच्या स्त्रीत्वाचा वेध घेत महाराष्ट्रातील नद्यांचे धार्मिक महत्त्व उद्धृत करणारे 'नदी आणि स्त्रीत्व' ... २३१

४१. गोदेच्या किनाऱ्यावरचं समृद्ध, प्रवाही, प्रांजळ जग : 'नदीष्ट' ... २३८

४२. जैविक संवेदनांचे आत्मिक दोलन मांडणारी कादंबरी : नदीष्ट ... २४३
४३. मानवी जीवन संस्कृतीचा अविभाज्य भाग : नदी... जीवनसरिता ... २४८
४४. गोदाकाठचा शब्दमय प्रवाह : 'नदीष्ट' ... २५४
४५. सुखनामायच्या विनाशपर्वाची कर्मकहाणी ... २५८
४६. नदीची व्यथा मांडणारी कविता : 'सुखना मायची कहाणी' ... २६२
४७. महापुराचा सामना करणाऱ्या शेतकऱ्याची संघर्ष गाथा : पाणीफेरा ... २६७
४८. 'जलसंवाद' या नियतकालिकाचे 'नदी' संवर्धनातील योगदान ... २७१
४९. नदीजोड प्रकल्प : वास्तविकता आणि आव्हाने ... २७५
५०. 'वारणा' पावसाळ्यात महापुराचे थैमान का मांडते? ... २८७
५१. महाराष्ट्रातील नदीकाठची धार्मिक स्थळे ... २९१
५२. पूर्व विदर्भातील जीवनदायिनी – वैनगंगा ... २९८
५३. भारताचे राष्ट्रीय जल अभियान आणि नदी प्रकल्प: एक परिचय ... ३०६
५४. गंगा नदी : पौराणिक इतिहास व सद्य:स्थिती ... ३१३
५५. 'भारतातील राष्ट्रीय नदी जोड प्रकल्प : स्वरूप आणि परिणाम' ... ३१८
५६. जीवनदायी गंगा नदी - प्रदूषण आणि संरक्षण: एक आढावा ... ३२७
५७. मराठी ग्रामीण ललित गद्यातील नदी- पाणवठ्याकाठच्या संस्कृतीचं चित्रण ... ३३६
५८. जैवविविधता... एक वरदान ... ३४२
५९. खडकपूर्णा नदीचा उगम व सामाजिक सांस्कृतिक इतिहास ... ३५२
६०. तीर्थरूपी नदी उगमास ... ३५७
६१. नर्मदेच्या तीरा-तीराने ... ३६१
६२. लढा सुखना नदीच्या अस्तित्वाचा ... ३६७
६३. भोरडी नदीचा कायापालट करणारे जलमित्र : भाऊसाहेब घुगे ... ३७२
६४. अति धार्मिकता, कर्मकांड आणि अंधश्रद्धा नद्यांना मारक ठरतात - एक चिकित्सा (गोदावरी नदीच्या विशेष अनुषंगाने) ... ३७५
६५. गाव शिवासाठी नदी पणाला जागते ... ३८३
६६. नदी वाचविण्यासाठी कवींचा पुढाकार ... ३८५

## • कविता •


१. प्रतिभा सराफ, मुंबई ... ३९०
२. कीर्ती जाधव, पुणे ... ३९१
३. सौ. कीर्ती विजय लंगडे, नागपूर ... ३९१
४. डॉ. अनुजा जोशी, गोवा ... ३९२
५. अशोक क. गायकवाड, पारळकर ... ३९३
६. तुकाराम पाटील, पाळधीकर ... ३९३
७. प्रा.डॉ. द्वारका गिते-मुंडे ... ३९४
८. डॉ. ज्योती कदम, नांदेड ... ३९५
९. उत्तम कोळगावकर ... ३९५
१०. श्री. एकनाथ गायकवाड, सिंधुदुर्ग ... ३९६
११. अरुणा दिवेगावकर ... ३९७
१२. सचिन शिंदे मुरली, उमरखेड ... ३९७
१३. डॉ. बाळू दुगडूमवार, नांदेड ... ३९८
१४. जयराम मोरे, सोनगीर ... ३९९
१५. रोशनकुमार शामजी पिलेवान, चंद्रपूर ... ३९९
१६. जितेंद्र कुवर, जळगाव ... ४००
१७. लक्ष्मण वाल्डे, कन्नड ... ४००
१८. देविदास सौदागर, तुळजापूर ... ४०१
१९. ज्ञानेश्वर गायके, कन्नड ... ४०२
२०. डॉ. नेहा सावंत, दहिसर- मुंबई ... ४०३
२१. चंद्रकांत कांबीरे, सातारा ... ४०३
२२. पी. विठ्ठल, नांदेड ... ४०४
२३. शंकर वाडेवाले, परभणी ... ४०५
२४. माधव गव्हाणे, नांदेड ... ४०५
२५. अनिल साबळे, जुन्नर ... ४०७
२६. वर्षा पतके-थोटे ... ४०८
२७. श्रीकांत ढेरंगे, ता.संगमनेर ... ४०८
२८. रश्मी भागवत ... ४०९
२९. रामचंद्र नांगलोत ... ४०९
३०. जगदीश कदम, नांदेड ... ४१०
३१. डॉ. कैलास दौंड ... ४११
३२. मूळ कविता : खलिल जिब्रान,
मराठी अनुवाद : जीवन आनंदगावकर ... ४११
३३. मूळ कविता : सुधांशू शर्मा,
मराठी अनुवाद : भरत यादव ... ४१२
३४. पवन नालट ... ४१३
३५. प्रा.मनोहर सुभाष निकम, सातारा ... ४१४
३६. प्रा.सौ. वर्षा कावरे, अकोला ... ४१४
३७. संदीप भुयेकर, वाराणसी ... ४१५
३८. दिगंबर कुलकर्णी, सिल्लोड ... ४१६
३९. इरा जोशी फाटक ... ४१७
४०. नारायण खरात, अंबड ... ४१७
४१. गणेश भाकरे, नागपूर ... ४१८
४२. प्रा.बी.एन. चौधरी, धरणगाव ... ४१८
४३. सतीश लोथे, नाशिक ... ४१९
४४. गो. शि. म्हसकर, नगरदेवळा जळगाव ... ४२०





# संपादकीय....

'नदी' हा मानवी जीवन व संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. हजारो वर्षांपासून या नदीकाठी माणूस वस्ती करुन राहू लागला. नदीकाठीच मानवी संस्कृती अधिकाधिक बहरत गेली. ऐतिहासिक, धार्मिक आणि सामाजिक दृष्टीने नदीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. धार्मिक व पौराणिक वाङ्मयापासून मध्ययुगीन तसेच आधुनिक मराठी साहित्यातही नदीविषयक अनेक संदर्भ पाहावयास मिळतात. लोकसाहित्याचा बराचसा भाग नदीविषयक चित्रणाने व्यापलेला आहे. अलिकडच्या काळात 'कौतुकी', 'नदी आणि मी', 'सुखनामायची कहाणी', 'सुखनेच्या तीरावर', 'नदिष्ट', 'नदी हसली, नदी रूसली' असे काही लेखन प्रसिद्ध झाले आहेत. त्याचप्रमाणे 'वाघूर' नदी विशेषांक, 'समास' नदी विशेषांकही प्रसिद्ध झालेले आहेत. त्यामुळे 'नदी' हा विषय चांगलाच चर्चेत आला आहे. नदी परिक्रमेवर आधारितही अनेक पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. विशेषतः 'कुणा एकाची भ्रमणगाथा', 'नर्मदे हर!', 'तिरे तिरे निरा', 'परिक्रमा माणगंगेची' या पुस्तकांनी मला विशेष प्रभावित केले. 'नदी' हा माझ्या आस्थेचा, आत्मियतेचा आणि चिंता व चिंतनाचा विषय राहिला आहे. माझे बालपण सुखना नदीकाठी व्यतित झाले. त्यामुळे एक नदी कायम माझ्या मनात निरंतर वाहत असते. आजही मी गावी गेलो की, नदीकाठी जाणे होतेच. लहानपणी पाहिलेली नदी व वर्तमानात तिचे असलेले विदारक चित्र, अतिक्रमण, प्रदुषण आणि वाढता अवैध वाळूउपसा यामुळे साऱ्याच नद्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. नद्यांना गटारगंगेचे स्वरुप प्राप्त झाले आहे या नद्या वाचविण्यासाठी आपण पुढे आले पाहिजे या भूमिकेतून प्रेरित होऊन आम्ही काही समविचारी मित्रांना सोबत घेऊन 'सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती'ची स्थापना केली. त्या जनआंदोलनाचा एक भाग म्हणून आम्ही विविध उपक्रम राबवू लागलो. हा प्रश्न केवळ एका नदीचा नाही, तर सर्वच भारतीय नद्यांचा आहे.

आजपर्यंत विविध भागात या नद्या वाचविण्याचा प्रयत्न अनेक जाणकार, अभ्यासक, कार्यकर्ते करीत आहेत. 'नदी' या विषयावर काम करताना नदीविषयक संदर्भाचा, साहित्याचा मी शोध घेऊ लागलो. अनेक महत्त्वाची पुस्तके मी वाचली. या विषयाला व्यापक बनविण्यासाठी तसेच शासन, समाज आणि जाणकारांचे लक्ष याकडे जावून नदीविषयीची जाणीव, जागृती निर्माण व्हावी, समाज नदीशी जोडला जावा आणि व्यापक विचारमंथन व्हावे, या महत्त्वपूर्ण उद्देशाने 'तिफण'च्या वतीने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर 'नदी विशेषांक' प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला. त्यासंदर्भात अनेक मित्रांशी चर्चा करुन या विषयाला मूर्त स्वरुप दिले आहे. नदीप्रेमी म्हणून या विषयाने मला अधिकच आकर्षित केले. आमच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अभ्यासक, जाणकार, सामाजिक कार्यकर्ते यांनी आपले लेख देऊन या अंकाला मूर्तरुप दिले आहे. ललित लेखनाबरोबरच संशोधनपर लेखनामुळे या अंकाला संदर्भमूल्य प्राप्त झाले आहे. हा अंक पर्यावरण व नदीप्रेमी नागरिक, अभ्यासक आणि या क्षेत्रात काम करणारे सामाजिक कार्यकर्ते यांना निश्चितच उपयुक्त ठरेल. या विशेषांकासाठी प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनेकांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे. 'नदी' हा केवळ पाहण्याचा नाही, तर अनुभवण्याचाही विषय आहे याचा प्रत्यय पुन्हा या अंकाच्या निमित्ताने आला आहे. नद्यांना पुन्हा गतवैभव प्राप्त होवून मानवी जीवन सुखी व समृद्ध व्हावे हा आशावाद व्यक्त करायला काय हरकत आहे! त्यासाठीच या विशेषांकाचे प्रयोजन आहे. दिवाळीनिमित्त आपणास खूप खूप शुभेच्छा!

**-संपादक**




-प्रा. चिन्मय मधू घैसास, *गोवा*

*लेखक शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.*

-प्राप्ती महेंद्रगावकर, *(संधोधक विद्यार्थी) गोवा*


**ब्रह्मपुत्र आणि सिंधू केवळ या दोनच भारतीय नद्या पुरुषरूप असून सिंधू नदी सिंहमुखातून वाहते असे म्हणतात. तसेच शीख लोक तिला 'सिंका बाप' म्हणतात. इतरवेळी नद्या या स्त्रीरूपच मानल्या गेलेल्या आहेत. नदीमाहात्म्यातील कथांमधून नद्यांचे स्त्रीरूप स्पष्ट होते. एखाद्या तपस्व्याच्या तपःसामर्थ्याने धास्तावलेला इंद्र आपल्या अप्सरांना त्यांची एकाग्रता भंग करण्यासाठी पाठवतो व तपस्वी त्या अप्सरेला 'तू नदी होशील' असा शाप देतो आणि नंतर मुख्य नदीला जाऊन मिळताच पुन्हा पूर्ववत होशील असा उःशापही देतो.**

# नदीच्या स्त्रीत्वाचा वेध घेत महाराष्ट्रातील नद्यांचे धार्मिक महत्त्व उद्धृत करणारे 'नदी आणि स्त्रीत्व'

## प्रस्तावना

'नदी आणि स्त्रीत्व' हे ॲरिझोना स्टेट यूनिवर्सिटीतील 'रिलीजिअस स्टडीज' विषयाच्या प्राध्यापिका ॲन फेल्डहाऊस यांच्या 'water and womanhood' या पुस्तकांचे भाषांतरित स्वरूप होय. विजया देव यांच्या कौशल्यपूर्ण भाषांतरातून हे पुस्तक मराठीत साकार झाले आहे. महाराष्ट्रातील लोकजीवन, लोकपरंपरा आणि धार्मिक परंपरा याविषयींचा तपशीलवार अभ्यास या पुस्तकामधून

दिसून येतो. महाराष्ट्रातील नद्यांचा स्त्रीत्वाच्या व धार्मिकतेच्या अंगाने केलेला अभ्यास, तसेच महाराष्ट्राचा क्षेत्रीय व भौगोलिक अभ्यास, मूर्तीशास्त्र, धार्मिक ग्रंथ, शास्त्रे, पुराणांचा सखोल अभ्यास व क्षेत्रीय कार्य यामुळे या पुस्तकाला संशोधन मूल्य प्राप्त झालेले दिसते.

भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे भारतीय संस्कृतीमध्ये नदीचे महत्त्व अद्वितीय आहे. नदी ही मातेसमान पूजनीय आहे. लोकवाङ्मय व लोकपरंपरेच्या दृष्टीने अभ्यास केला असता, नदीच्या स्त्रीत्वाचे अनेक दाखले आपल्याला पाहावयास मिळतात. तशीच नदीविषयीच्या अनेक मिथकांची, धार्मिक संस्कृती व संकल्पनांचीही जाणीव होते. भारतीय संस्कृतीमध्ये जल व जलदेवतांना असलेले केंद्रीभूत स्थान आणि नद्यांशी संबंधित असलेल्या स्त्रीत्व, समृद्धता, पुत्रप्राप्ती, संतती, दीर्घायुष्य, सौंदर्य, संपन्नता अशा विषयांचा विचार या पुस्तकामध्ये प्रामुख्याने केलेला आहे. अनेक लोककथा, विधी आणि देवता यांमध्ये आढळून येणारे साम्य आणि कथांमधील एकचएक आशयसूत्र दाखवणे हाच या पुस्तकाचा हेतु असलेला दिसतो.

माहात्म्य संहिता, क्षेत्रीय अभ्यास, प्रवासवर्णने, गॅझेटियर्स आणि आख्यायिका ह्या पुस्तकाचा मूलाधार आहे. नद्यांचे महत्त्व केवळ अशुचित्व दूर करण्याइतकेच सीमित नसून मानवी आयुष्यात महत्त्वाच्या वाटणाऱ्या अनेक गोष्टींचा संबंध नद्यांशी जोडलेला दिसतो. शुचित्व-अशुचित्वा बरोबरच आणखी अशा बहुविध गोष्टी त्यामध्ये सामावलेल्या आहेत हे 'नदी आणि स्त्रीत्व' या पुस्तकाच्या माध्यमातून अनेक उदाहरणांसाहित पाहायला मिळते.

**पर्वत नद्या आणि शंकर**

पर्वत नद्या आणि शंकर (दैवत) यांमध्ये कमालीचे साहचर्य असल्याचे वेगवेगळ्या मौखिक वाङ्मयाद्वारे, धार्मिक समजुती व लोकांच्या प्रतिसादातून पाहायला मिळते. नद्या पर्वतशिखरांवर, शिवलिंगच्या समीप उगम पावतात या कल्पनेला मानसिक ऊर्जा आणि स्थापत्यकौशल्य यांचे पाठबळ लाभलेले दिसते. नदीचा उगम हा भगवान शंकरांच्या जटांमध्ये तर कधी तो शिवलिंगातून होतो असे मानतात (महाबळेश्वरच्या पंचगंगा नदीच्या बाबतीत हा समज आहे). ह्या विधानाला पुष्टी देण्यासाठी गंगावतरणाची कथा आलेली आहे. ही कथा म्हणजे वेद, महाकाव्य आणि मौखिक परंपरा यामध्ये येणाऱ्या कथाभागांच्या मिश्रणातून निर्माण झालेली आहे.

ब्रह्मा, विष्णु आणि महेश ह्या त्रिदैवताना नदीची निर्मिती व तिचे पृथ्वीवर अवतरण यामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. गंगा आणि गोदावरी यांच्या अवतरणाचा कथाभाग समान असून  केवळ गोदावरी गंगेपेक्षा ज्येष्ठ असल्याचे सिद्ध केले गेले आहे. गोदावरी गंगेपूर्वी पृथ्वीतलावर अवतरली असून तिला वृद्धा गंगा म्हटले आहे. गौतम या ब्राह्मण ऋषीने तिला पृथ्वीवर आणले म्हणून तिला गौतमी गंगा असेही म्हणतात. महाराष्ट्रातील गोदावरीला पृथ्वीवर आणणारा गौतम हा ब्राह्मण होता तर उत्तर भारतातील गंगेला पृथ्वीवर आणणारा भगीरथ हा क्षत्रीय होता. पुराणातील वर्णव्यवस्थे प्रमाणे ब्राह्मण हा क्षत्रियांपेक्षा श्रेष्ठ म्हणूनच गोदावरीला महत्वपूर्ण स्थान दिलेले आहे.

भीमा नदीच्या उगमासंदर्भात सांगतानाही एक कथा या ठिकाणी येते. त्रिपुरासुराशी झालेल्या संघर्षात शंकराला घाम आला आणि ते धर्मबिंदू हाच भीमाशंकर येथील भिमेचा उगम असे मानण्यात येते. शंकर, पर्वत आणि नद्या यांमध्ये 'वैश्विक लैंगिक' (Cosmo-sexual) हाही घटक आहे. भारतीय नद्या बहुतांशी स्त्रीलिंगी मानलेल्या आहेत तर शिवलिंग हे शंकराच्या पुरुषत्वाचे प्रतीक आहे. शंकराच्या जटांमधून वाहणारी गंगा ही पार्वतीला सवती समान वाटते मात्र साहितांमध्ये कुठेच लैंगिक प्रतिमासृष्टी आढळून येत नाही म्हणूनच की काय ती लिंगाभोवती न वाहता शंकराच्या जटेतून

वाहते असे म्हटले आहे. शंकराच्या पिंडीवर पाण्याचा करण्यात येणारा जलाभिषेक यातून शंकर आणि नदी यांतील साहचर्य स्पष्ट करताना मंदिरात पाणी वाहून नेण्याचे अनेक विधीहि या पुस्तकात समाविष्ट केलेले आहेत. हे विधी प्रामुख्याने गोदावरी नदीच्या बाबतीत आहेत.

डोंगरावरील मंदिरात वा आजूबाजूच्या तीर्थक्षेत्रावर पाणी वाहून नेण्यासाठी भोपळे व कावड यांचा वापर केला जातो. ही रीत केवळ परंपरेने चालत आली आहे म्हणून केली जाते. काही अपवाद सोडल्यास त्यामागे कोणताही व्यक्तीगत हेतु वा मागणे असल्याचे दिसत नाही. "लोकधर्म स्वतःचे स्पष्टीकरण देत नाही" या सॉन्थायमरच्या विधानाला या उदाहरणाद्वारे पुष्टी मिळालेली आहे. पाणी वाहून नेण्याच्या या कथांमध्ये संत एकनाथांचाही समावेश झालेला आहे. एकनाथ पाण्याची कावड घेऊन वारणाशीहून रामेश्वरला चालले असता वाटेत त्यांना तहानलेल्या गाढवामध्येच विठ्ठल दिसला व त्यांनी त्याला गंगाजल पाजले. अशा अनेक कथांमधून शिवलिंग, पर्वत आणि नद्या यांच्यातील परस्पर अनुबंधाला पुष्टी मिळते.

**नद्यांचे स्त्रीत्व**

या पुस्तकामधून नद्या स्त्रीरूप असतात व त्या गोमुखातून वाहतात या कल्पनेला कथात्मक, धार्मिक विधी, आणि मूर्तीशास्त्रात्मक दाखले देऊन सिद्ध केलेले आहे. कृष्णा नदीच्या उगमाची कथा ही त्याचेच एक उदाहरण म्हणून येते. कृष्णा नदी जिथून वाहते पूर्वी तिथे दुष्काळ होता. पावसा-पाण्याचा अभाव होता. लोकांना पाणी आणण्यासाठी दूरवर जावे लागे, अशावेळी कृष्णा नावाच्या बाईने कड्यावरून उडी मारली आणि तिथून आपोआप पाणी सुटून नदी वाहू लागली ती 'कृष्णा'.

ब्रह्मपुत्र आणि सिंधू केवळ या दोनच भारतीय नद्या पुरुषरूप असून सिंधू नदी सिंहमुखातून वाहते असे म्हणतात. तसेच शीख लोक तिला 'सिंका बाप' म्हणतात. इतरवेळी नद्या या स्त्रीरूपच मानल्या गेलेल्या आहेत. नदीमाहात्म्यातील कथांमधून नद्यांचे स्त्रीरूप स्पष्ट होते. एखाद्या तपस्व्याच्या तपःसामर्थ्याने धास्तावलेला इंद्र आपल्या अप्सरांना त्यांची एकाग्रता भंग करण्यासाठी पाठवतो व तपस्वी त्या अप्सरेला "तू नदी होशील" असा शाप देतो आणि नंतर मुख्य नदीला जाऊन मिळताच पुन्हा पूर्ववत होशील असा उःशापही देतो. भीमा नदीच्या उपनद्या असलेल्या पुण्यातील 'मुळा', 'मुठा' या नद्या हे त्याचेच उदाहरण होय. अशा एकाच आशयाच्या अनेक कथा यामध्ये येतात. याला अपवाद म्हणून तुरळक कथा येतात ज्यात पुरूषांचे रूपांतर नदीत झालेले आहे.

तशीच एक कथा ज्यामध्ये ब्रह्मदेवांची प्रथम पत्नी सावित्री ही ब्रह्मा, विष्णु, महेश यांसहित ब्रह्मदेवांची द्वितीय पत्नी गायत्री यांना नदी होण्याचा शाप देते. ह्यामुळे क्रोधित होऊन विष्णु सुद्धा सावित्रीला नदी मध्ये परिवर्तीत होण्याचा शाप देतात अशा तऱ्हेने विष्णुंचे रूपांतर कृष्णा नदीत, शिवांचे वेण्णा नदीत तर ब्रह्माचे रूपांतर कोयना नदीत होते. सावित्री व गायत्री याही नदी रूपात अवतरतात. कृष्णा नदीच्या मंदिरात कृष्णाच्या मूर्तीची पुजा करतात त्यामागे हेही एक कारण असावे. अनेक कथांमधून नद्यांना देवाची बहीण मानलेले आहे. यातूनही नदीचे स्त्रीरूपच अधोरेखित होते, तर अनेक ठिकाणी नदी ही समुद्राची पत्नी मानली गेलेली आहे. कृष्णामाहात्म्य व तंजावरच्या शहाजी राजांचे 'गंगा कावेरी संवाद' सारखे नाटक यातून हा दाखला देता येतो.

महाभारतातील कौरव पांडवांच्या वंशाला कुरुवंश हे नाव पडले तो कुरू राजा म्हणजे तापी नदीला पती संवरण यापासून झालेला त्यांचा पुत्र. समुद्रदेवतेचा पृथ्वीवरील अवतार असलेला संवरण व तापी नदीची प्रेमकहाणी सांगणारी ही कथा सापडते. धार्मिक विधींद्वारेही नद्यांच्या स्त्री असण्याला पुष्टी मिळते. नदीला हळद कुंकू वाहणे, नदीची खणा नारळाने ओटी भरणे, नदीला साडी नेसवणे

असे अनेक धार्मिक विधी महाराष्ट्रात केले जातात. बरेच ठिकाणी नदीतून एक हात वर येतो आणि नदी ओटी स्वीकारते अशा ऐकीव कथा येतात. या कथांची सत्यता पडताळून देण्याचा भाग सोडल्यास या विधींद्वारे नदीला माणुसपण, स्त्रीपण बहाल केलेले इथे दिसते.

इतरवेळी नदीची ओटी भरणे यामागचे प्रयोजन नदीला आलेला पूर शांत करणे, नदीला प्रसन्न करणे, दुर्भिक्ष्य असल्यास नदीला पाणी यावे व अन्न-धान्याची भरभराट व्हावी अथवा संतानप्राप्ती, सौभाग्यप्राप्ती व्हावी असे आहे. पावसाळ्यात नद्यांमध्ये आंघोळ करू नये कारण नद्या रजस्वला असतात व नद्यांना ऋतुप्राप्ती होते असेही मानले जाते. संस्कृत पुराणातील हे समजही नदीचे स्त्रीत्व दृढ करतात. नदी ही मातृसमान असली तरी नद्यांना संतान प्राप्ती होते असा उल्लेख कुठेही येत नाही.

नद्या या केवळ मानवाच्या उद्धारकर्त्या, पालनकर्त्या असल्याने त्यांना मातृत्व दिले गेलेले आहे. अनेक लोककथांच्या, पुराणकथांच्या तसेच मूर्तीशास्त्राच्या आधारे नदीचे गोमुखातून अवतरण होते हे इथे अधोरेखित केले गेलेले आहे. महाबळेश्वरच्या पंचगंगा मंदिरात गोमुखातून पडणारी धार, ब्रह्मगिरीवर गौतमाने मारलेली दोन भागांत दिसणारी गाय ही काही उदाहरणे आहेत. गोदा या शब्दाची प्रतिमाही थेट गायीशी जोडलेली आहे. 'गो' म्हणजे गाय आणि 'दा' म्हणजे दान करणे असा त्याचा अर्थ सूचित होतो. याच अर्थातून गोदावरीवर सोन्या-चांदी-पितळीच्या छोट्या गाई दान देतात.

### नदीदेवता, लोकदेवतांचे आधुनिक उत्सव व नवस

नदीरूपात येणाऱ्या तीन देवता म्हणजे साती आसरा, लोकदेवता आणि आधुनिक पद्धतीने पूजल्या जाणाऱ्या देवता होय. साती आसरांना 'मावलाया' असे म्हणत असून त्यांचे साधर्म्य सत्वगुणदेवांपेक्षा भुतपिशाच्चांशीच जास्त असते. आसरा हा शब्द शब्दावरून आला आहे. आसरा म्हणजे इंद्राचे असे मानतात. आसरा हा शब्द अप्सरस् या सं शब्दावरून आला आहे. मात्र यासंदर्भात फारसे लोकांना असलेले दिसत नाही.

पऱ्या ह्या संदर्भात साती आसरांचा उल्लेख ये सात आसरांसोबतच एक राखणदार असतो त्या म्हसोबा असे म्हणतात तर कोल्हापूर सारख्या ठि त्याला झोटिंग असे संबोधतात. हा राखणदार म्ह सात आसरांचा भाऊ असे मानण्यात येते. कोणत्या कथेत वा वाङ्मयात राखणदार हा साती आसरांचा असल्याचे पुरावे सापडत नाहीत. याउलट तो भाऊ हे अनेक पुराव्यानिशी सांगता येते. हा म्हसोबा हा पिशाच्चाप्रमाणे बाधाकारी असतो. ठराविक वि झऱ्यांशी काही ठिकाणे, नदीकाठचे खडक, अशा ठिकाणी त्यांचे वास्तव्य असते. त्यांचे अस्ति कुंकुवाच्या सात ठिपक्यांनी अधोरेखित होते.

साती आसरांचे टाकही काही ठिकाणी आहेत. आसरांची बाधा होते असे मानतात. कोऱ्या (वांझोट्या) आसरा व सुहासिनी (लेकुरवाळया) आसरा प्रकारही ह्यांत आहेत. ज्यांना साती आसरा लाग त्या स्त्रियांना संतानप्राप्ती, पुत्रप्राप्तीमध्ये बाधा ये तसेच त्यांच्या मासिक धर्मातही बाधा येते. साती आ (विशेषतः कोऱ्या) लागल्या म्हणजे पुत्रशोक हो किंवा माणूस पाण्यात बुडून मरतो अशा अनेक क आहेत. याला पुष्टी देणाऱ्या अनेक लोकानुभवांच्या व कथा या पुस्तकामध्ये योग्य प्रकारे येतात.

दुसऱ्या प्रकारच्या नदीदेवता लोकदेव स्वरुपात येतात. नीरा गावाजवळची नागाई, हो ढगाई, कांबळेश्वरची भिवाई आणि अकलूज जव वज्राई, मुंगादेवी, मळगंगा अशा अनेक लोक पूजल्या जातात. ह्या देवतांची देवळे किंवा घुमट्या त्या नदीच्या काठावर असतात आणि नदी हेच दे

र असे मानले जाते. आधुनिक देवता मात्र अशा नदीत ास्तव्य करत नसून त्या मूर्तरूपात अवतरतात. अशा वतांचे स्वतंत्र मंदिर असते व देवतांच्या मूर्तीचे पूजन ले जाते. महाबळेश्वरची पंचगंगा, सासवडचे कऱ्हा दीचे देऊळ, गोदावरीची नाशकातील तीन देवळे अशी ाही उदाहरणे देता येतील.

या नदीदेवतांच्या मूर्ती मूर्तीशास्त्रदृष्ट्या बऱ्याच कसारख्या आहेत. बहुतेक वेळा चतुर्भुजा स्त्रीची आकृती असते मात्र यांत काही अपवादही आहेत. दी ही स्त्रीरूप सवाशीण/सुहासिनी असली तरी तिचा ती कोण? याबाबत माहिती मिळत नाही किंबहुना या ुद्याला फारसे महत्त्व नाही. यांपैकी कुणाचेच मर्त्य ानवाशी लग्न न झाले असल्याने ह्या कुणालाही वैधव्य ेत नाही. म्हणूनच ह्या मांगल्यप्रद असतात. सौंदर्य, ाम, ऐश्वर्य, समृद्धी आणि ऐहिक जगातील सर्व त्वगुणी, सुमंगल गोष्टींचे त्या प्रतीक असतात.

बहुतांश ठिकाणी पुत्रप्राप्ती, संतानप्राप्ती या हेतूनेच नदी देवतांचे पूजाविधी केले जातात. मात्र महाराष्ट्राच्या संस्कृतीत नद्यांच्या भयकारी रूपालाही स्थान असलेले दिसते. पुत्रसौभाग्य प्राप्त व्हावे म्हणून नदीला नवस-सायास केले जातात व पुत्रप्राप्ती नंतर नदी देवतेला जावळ देणे, मुलांचे कपडे देणे अशा स्वरुपात नवस फेडला जातो. अनेक ठिकाणी मुलांना पाळण्यात बसवून नदीत फिरवले जाते. हे करत असताना आईच्या वा ज्याने नवस केला त्यांच्या मनात जर शंका किंवा भीती असेल तर मूल पाण्यात बुडते व पुन्हा कधीही परत येत नाही असा समज आहे. याला पुष्टी देणाऱ्या अनेक ऐकीव कथाही आहेत. आपल्या मुला-लेकरांना पाळण्यात घालून पाण्यावर फिरवणे हा विधी म्हणजे जणू काही कृतक बळी वाटतो. नदी देवतांचे आधुनिक उत्सव भव्य असून एकापेक्षा अधिक दिवस चालणारे आहेत, उदा. कृष्णाबाईचे उत्सव.

हे उत्सव विशेषकरून ब्राह्मण समाजाचे आहेत. हे उत्सव साती आसरा व लोक देवतांच्या उत्सवांपेक्षा वेगळे आहेत. या उत्सवांकरता मांडव टाकला जातो, दररोज देवीची पुजा असते. नदी तीरावर नदीची पूजाही केली जाते. सार्वजनिक महाप्रसाद भोजनव्यवस्था असते. भजन, कीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम व मिरवणूक वा पालखी असते. देवीला देण्यात येणारे नारळ, तांदूळ, साडीचोळी व इतर गोष्टींचा मक्ता, बोली वगैरे प्रकार केले जातात. कृष्णाबाईच्या उत्सवाला विशेष ऐतिहासिक महत्त्व आहे. कृष्णाबाईच्या उत्सवात इतर जातीय लोकांचाही समावेश असतो. एकंदरच संस्कृती टिकवणे (सांस्कृतिकता) आणि मोठ्या संख्येने एकत्रित येणे (एकता) हे या उत्सवांचे वैशिष्ट्य आहे.

**पापक्षालन, समृद्धता आणि निसर्गसंपदा**

पापक्षालन, असुरांचा विनाश व आपत्ती वा दुष्काळ यांचे निवारण करण्याचे काम नदी करते असे मानले गेले आहे. पाप या संकल्पनेविषयी सांगताना पापाचे काही प्रकार नदी माहात्म्यातील श्लोक स्वरुपात सांगितलेले आहेत.

*'अहिल्येशी इंद्र रममाण ।*
*चंद्रे गुरुपत्नि अभिलाषिली ॥*
*सूर्य तापवी जनाना ।*
*यम देई नरक यातना ॥*
*विष्णू करी राक्षस हनना ।*
*ब्रह्मा पापदृष्टी कन्या पाही ॥*
*ब्रह्मशीर शिव तोडित...*[१]'


चोरी, दरोडेखोरी, पाकीटमारी, लालसा, कंजूषपणा, कृपणता, जुगार, तसेच अनैतिक संबंध, मात्रागम, गुरुतल्प, ब्रह्महत्या वगैरे पापांतून मुक्ती मिळावी यासाठी नदीत स्नान केले जाते. विशेष म्हणजे ब्राह्मण ज्ञातीतील दुरितांचा संहार केल्यावरही ब्रह्महत्येचे पातक लागते त्यासाठी नदीत स्नान करणे हे प्रायश्चित्त सांगितलेले आहे. उदाहरणार्थ हिरण्यकश्यपूचा वध केल्यावर नरसिंहाला पूर्णा नदीवर स्नान करावे लागते.

एखादा राक्षस नदीकाठी वा नदीच्या साहाय्याने मारला जातो (राक्षस भुवनच्या अश्वत्थ आणि पिप्पल या असुराची कथा हे नदीकाठी घडणाऱ्या असुरवधाचे उदाहरण आहे).

अनेकदा नदीच्या वा नदीतील उदकाच्या स्पर्शाने असुराचे परिवर्तन सुरात व दुष्टाचे परिवर्तन सुष्टात होते. नद्यांचा प्रवाहीपणा आणि ओलेपणा या दोन गुणांमुळे नद्यांना महत्त्व आलेले आहे. जे काही पातक आहे, मलीन व अस्वच्छ आहे ते प्रवाहीपणामुळे नद्या वाहून नेतात व शुद्ध, स्वच्छ करतात. ओलेपणामुळे जे काही रुक्ष, शुष्क व निर्जीव आहे ते सुंदर व सजीव होते. नदीमुळे दुर्भिक्ष्य व दुष्काळाचे निराकरण होते.

*'यमनियमानुष्ठान । आहेत सुबत्तेकारण ॥*
*सुबत्ता पर्जन्याधीन । हें न कां तू जाणसी?'*

नदीमुळे दुष्काळ संपुष्टात येतो, तसेच दुष्काळाच्या हातात हात घालून येणाऱ्या अरिष्टांना, माणसाच्या हातून घडणाऱ्या पापांना नद्याच पायबंद घालतात. गोदावरी माहात्म्यात विश्वामित्राच्या संवादात हा श्लोक येतो. नद्यांमध्ये पापमोचनाचे, सुपीक करण्याचे सामर्थ्य असते. स्त्रीत्वाबरोबरच सुफलताही नद्यांच्या धार्मिक स्थानाच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसते. हाच मुद्दा या पुस्तकातून नदीमाहात्मे व धार्मिक ग्रंथांच्या आधारे स्पष्ट केला आहे. कृष्णाबाई व आधुनिक नदी-देवतांचे माहात्म्य मात्र लिहिले गेलेले नाही. नदीतील काही मासे, देवमासे, देवीचे मासे वा आसरांचे मासे म्हणून ओळखले जातात.




हे मासे मोठे असतात.

नदीतल्या ह्या देवीच्या माशांना नथ घालण्याचा अनोखा नवस केला जातो. नवस फेडताना देवमासा पकडून त्याला नथ घातली जाते आणि तो पुन्हा नदीत सोडून दिला जातो. हे डोहातले मासे म्हणजे नदीच्या पाण्यातील अद्भुत संपत्तीचा भाग होय. पूर्वी म्हटल्याप्रमाणे गाय आणि नदी यांचाही संबंध संपन्नता आणि भरभराटीशी येतो. गाय, पृथ्वी, अरण्ये व नदी यांच्यातले साम्य येथे येते. या सर्वांमध्ये संपन्नता व भरभराट हे घटक समान तत्त्वाने येतात. नदीकाठी दानधर्म, यज्ञयाग, अन्नदानाचे विधी आणि पितरांचे विधी, श्राद्धकर्म, तर्पण असे विधी केले जातात.

नदीकाठी तप केल्यास इच्छित वर प्राप्त होतो तसेच इच्छित फलपप्राप्ती होते हे दर्शविणाऱ्या अनेक कथांचा धांडोळा घेतला आहे. पापामुळे किंवा श्रापामुळे झालेले रोग, कुष्टरोग, त्वचारोग नदीमुळे बरे होतात तसेच व्यंग्य, कुरूपता संपुष्टात येते. अन्न, धनधान्य, संपत्ती, साम्राज्य, आरोग्य, सौंदर्य आणि सुफलता या इच्छित गोष्टी नदीमुळे विपुल प्रमाणात प्राप्त होतात. नदीचे माहात्म्य तिच्या ह्या समृद्धीमुळे वृद्धिंगत होताना दिसते.

**समारोप**

नदी आणि स्त्रीत्व यामधून महाराष्ट्रातील नद्यांचे धार्मिक महत्त्व कथन केलेले आहे. दुष्काळ आणि सुकाळ, मृत्यू आणि जीवन आणि नदीचे स्त्रीत्व ही सर्व, महाराष्ट्रातील नद्यांशी निगडीत असलेले लोकजीवनातले धार्मिक विधी आणि मौखिक परंपरा यांची महत्त्वाची

सूत्रे आहेत. या पुस्तकातील संदर्भांवरून ही सर्व सूत्रे पारंपरिक पोथीपुराणांपेक्षा कर्मकांड, मूर्तीशास्त्र आणि मौखिक साहित्यात ठळक स्वरुपात आढळतात. नदी ही बहुफलदायिनी असून भारतीय लोकसंस्कृतीत केवळ अशुभ निवारणच नव्हे तर इतर अनेक गोष्टी नदीशी निगडीत असल्याचे स्पष्ट होते.

नदीचे पावित्र्य केवळ तिच्या पाण्यात नसून तिच्या खळाळण्यात वा वाहत्या पाण्यात आहे. नदीचा ओलेपणा हा नदीच्या शुद्धतेशी निगडीत असलेला दुसरा गुण म्हणता येतो. पोटी मुले नसूनही नदीला आई मानले जाते ते केवळ तिच्या भाविकांची किंवा जनसामान्यांची माता म्हणूनच होय. जगाला अन्न पुरवून, जगाला जीवन देते म्हणून तिला जीवनदात्री माता म्हटलेले आहे हेच या पुस्तकातून स्पष्ट होते. 'नदी आणि स्त्रीत्व' हे पुस्तक म्हणजे महाराष्ट्रातील नद्यांच्या संदर्भातील लोकसमजूतींचा कोश म्हणावा एवढे समृद्ध आहे.

या पुस्तकाद्वारे केवळ नद्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक विशेषांचाच नव्हे तर महाराष्ट्रातील लोकांच्या मानसिकता, जाणिवा व भावभावनांचा व श्रद्धांधश्रद्धांचा वेध घेतलेला दिसतो. या पुस्तकाच्या संपूर्ण लेखनात कोणत्याच अंगाने पूर्वग्रह वा पक्षपात झालेला दिसत नाही. ताठस्त्य, सुसूत्रीपणा आणि तपशीलवार वर्णन हा या पुस्तकाचा विशेष म्हणावा लागेल.

**संदर्भ**

१. देव, विजया, नदी आणि स्त्रीत्व (भाषांतर), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१४

•••

**– प्राप्ती महेंद्र गांवकर**
एम. ए. (मराठी), भाग १, गोवा विद्यापीठ
एम. ए. (प्रथम वर्ष),
मो. ७०३८१७३९०५
आणि
**– प्रा.चिन्मय मधू घैसास**
सहायक प्राध्यापक,
मराठी अध्ययन शाखा, गोवा विद्यापीठ
Email : ghaisaschinmay@gmail.com